मंगळवार, दि. १७ जानेवारी, २०२३

आझादी का अमृतमहोत्सवाचे औचित्य साधत मराठी विभाग आयोजित

## प्रा. डॉ. एन. डी. पाटील स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमाला सांगता समारंभ

## आणि

## प्रा. डॉ. एन. डी. पाटील प्रथम स्मृतिदिन

## वक्ते – मा. किशोर बेडकिहाळ

### अहवाल

### सत्य आणि अहिंसा चळवळींवापर राजकारासाठी अयोग्य - किशोर बेडकिहाळ

''एन. टी. पाटील यांना सहकारी चळवळींचा वापर राजकारणासाठी करणे मान्य नव्हते. शेतकऱ्यांच्या हातात पैसा यावा, यासाठी त्यांनी सहकारी चळवळींना पाठबळ दिले. व्यवस्थेमध्ये एकटा व्यक्ती देखील अतिशय महत्त्वाचा असतो. व्यवस्थाबदलासाठी एका माणसाचा आवाजसुद्धा महत्त्वाचा ठरू शकतो, याचा विश्वास एन.डींनी महाराष्ट्राला दिला. रस्त्यावरील सामान्य माणसाचा आवाजाचे मूल्य त्यांनी राजकर्त्यांना दाखवून दिले. रस्त्यावरील चळवळीतून राजकर्त्यांना लोकाभिमुख निर्णय घेण्यास भाग पाडले. खोटी आश्वासने देऊन लोकसंग्रह वाढवण्यासाठी नितीमूल्यांना पायदळी तुडवणे एन.डीं कधीच मान्य नव्हते. त्यामुळे स्वतंत्रोत्तर काळात पुढील ७५ वर्ष एन.डी. पाटील यांनी लोककल्याणासाठी केलेली आंदोलने, मोर्चे आणि चळवळी यातून एक आदर्श नेतृत्त्वाचा वस्तुपाठ उभा केला. सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांशी निगडीत अंदोलनात हिंसा उपयोगी ठरणार नाही. तेव्हा सत्य आणि अहिंसा या दोन तत्त्वांचा आधार घेत, त्यांनी आपली आंदोलने यशस्वी केली.'' असे मत किशोर बेडकिहाळ यांनी मांडले. ते रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात बोलत होते. मराठी विभागाच्या वतीने प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित व्याख्यानमालेच्या सांगता समारंभ आणि पहिल्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित समारंभात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, ''एन.डी. पाटील हे सर्वमान्य परंतु स्वत:ची तात्त्विक भूमिका असणारे अभ्यासू नेतृत्व होते. त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचे कधीच विखंडन झाले नाही. ते जसे आतून बाहेरून सार्वत्रिक जीवनात एकसारखेच वागले व जगले. त्यामुळेच नेहमीच शासनकर्त्यांवर त्यांचा नैतिक धाक राहिला.''

अध्यक्षीय मनोगतात जे. के. (बापू) म्हणाले, ''प्रा. एन. डी. पाटील यांनी शोषितांना शोषणाच्या विळख्यातून मोकळा करणारा विचार दिला. खेड्यापाड्यांचा विकास आणि शेतकऱ्याचे कल्याण व्हायचे असेल तर निकोप सहकारी संस्था निर्माण झाल्या पाहिजेत. या सहकारी संस्थाच गावखेड्यांना तारू शकतात, हे ओळखून एन.डी.सर हयातभर शेकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले. सर्वसामान्य कष्टकरी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी एनडींनी आयुष्यभर शासनाबरोबर लढणारा एकमेव नेता म्हणून एन. डी. पाटील यांचा उल्लेख करावा लागेल. यावेळी ज्येष्ठ विचारवंत व्ही. वाय. (आबा) पाटील, प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. काकासाहेब भोसले यांनी केली. पाहुण्याचा परिचय व स्वागत डॉ. तेजस चव्हाण, आभार प्रा. दिलीप कोने यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले.

**निष्पत्ती :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या सामाजिक कार्याचे महत्त्व कळाले.

**लाभार्थी :** 50

काही क्षणचित्रे....

**विषय** –प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी महाराष्ट्राला काय दिले **वक्ते** – मा. प्रा. सचिन गरुड











विभागप्रमुख
मराठी विभाग

प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

Principal
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,
Ramanandnagar (Burli)